# वेडे

रस्त्यांवर पडलेले काटे मी
जमा करत असतो
लोकांच्या गुलाबफुलांकडे
पाहत पाहत ...
कारण...
हल्ली प्रत्येकाजवळ
गुलाब स्वतःहून जमतात
मला मात्र रस्त्यावर वेगवेगळे काटे भेटतात,
अगदी कडकडून !
कारण .........
हल्लीच कळलं मला
गुलाबफुलांच्या काट्यांना
खूप दुःख असतात म्हणून !
मी दंग असतो
त्यांना वेचण्यात !
अन्
लोकांना वाटतं......
मी खर वेडा असावा !
मी आहे थोडा वेडा
कारण ......
त्यांच्याजवळची गुलाबफुलं
सुकून गेलेली असतात
'रेड लाईट' एरियावर फिरवून फिरवून
रात्री कधी तरी...... !
अन्
माझ्याजवळचे काटे सकाळीच
झालेले असतात निःशस्त्र, शांत......
अगदी माझ्यासारखे...
कारण ...
ते वेडे झालेले असतात
नेमके माझ्यासारखे...
माझ्याजवळ, माझ्या कुशीत येऊन!

***गणेश विजयकांत कुलकर्णी***
***9881603251***